**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ०६/२०२५ मधील निशाणी ०९ खालील आदेश</u>**
**<u>(CNR No. MHRT08-000056-2025)</u>**

वादीतर्फे विधीज्ञांना कागदपत्रांना निशाणी क्रमांक देवून पुराव्यात वाचण्याच्या मुद्यावर ऐकले. प्रतिवादीतर्फे पुकारले असता कोणीही हजर नाही. अभिलेख पाहिले.

**०२**. परीच्छेद क्रमांक १२ मध्ये वादीने निशाणी क्र. ०५ कडील कागदपत्रांच्या यादीसोबत अनुक्रमांक ०१ वर प्रतिवादीने त्याला दिलेल्या बँक ऑफ इंडिया, शाखा–देवरुख चा धनादेश क्र. ०९९३१३ मुळ प्रतीत सादर केल्याचे, सदरचा धनादेश न वठणेबाबतचे अनुक्रमांक ०२ ते ०४ कडील आयडीबीआय बँक, देवरुखचा दिनांक २२/०५/२०२५, दिनांक २८/०६/२०२३, दिनांक १४/११/२०२३ रोजीचे मेमो सादर केल्याचे कथन केले आहे. अनुक्रमांक ०५ कडील प्रतिवादीस पाठविलेली नोटीसची स्थळप्रत, अनुक्रमांक ०६ कडील नोटीसची पाठविल्याचे पोस्टाची पावती, अनुक्रमांक ०७ कडील नोटीस प्रतिवादीला मिळाल्याची पोस्टाची पोहोच पावती व अनुक्रमांक ०८ कडील आधारकार्डची छायांकित प्रत दाखल केली आहे. या सर्व कागदपत्रांचा उल्लेख वादीने प्रस्तुत सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात केला आहे.

**०३**. सदर कागदपत्रे पाहिली असता, अनुक्रमांक ०२ व ०३ कडील आयडीबीआय बँकेच्या मेमोवर कोणाचीही स्वाक्षरी असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे, त्यांना निशाणी क्रमांक देवुन ते पुराव्यात वाचता येणार नाहीत. तसेच अनुक्रमांक ०८ कडील आधारकार्ड छायांकित प्रत असल्याने ते पुराव्यात वाचता येणार नाही. *(सबब, निशाणी क्र. ०५ कडील कागदपत्रांच्या यादीसोबत अनुक्रमांक ०१, ०४, ०५ ते ०७ यांना पुढील* ***<u>निशाणी क्रमांक १० ते १४</u>*** *देण्यात येते).*

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.09.23 18:31:45 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक २३/०९/२०२५** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख,**

**देवरुख.** **जि. रत्नागिरी.**

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date | :- | 23/09/2025 |
| order signed by PO. on | :- | 23/09/2025 |
| order uploaded on | :- | 23/09/2025 |